RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TIL

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Research Journal

[illegible]

## UGC Approved Journal

Editor

Dr. Sadashiv H. Sarkate

• Mailing Address •

Dr. Sadashiv H. Sarkate

Editor POWER OF KNOWLEDGE

Head of Dept. Marathi

Art's & Science College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)

Cell. No. 9420029115 / 7875827115

Email : powerofknowledge3@gmail.com / shsarkate@gmail.com

Price : Rs. 300/-

Annual Subscription: Rs. 2000/-

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Dist.Nanded




| | | | |
|---|---|---|---|
| २२ | बीड जिल्ह्यातील डाळींब फलोत्पादन शेतीचा भौगोलिक अभ्यास | प्रा. श्रीमती एम.एस. टेकाडे<br>प्रा. डॉ. मधुकर गणपतराव राजपांगे | ८५ |
| २३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संसदीय लोकशाही | प्रा. डॉ. नरवाडे भाऊराव माधवराव | ८९ |
| २४ | मराठी निर्मितीचा पुनर्विचार : एक अभ्यास | प्रा.डॉ.सदाशिव सरकटे | ९२ |
| २५ | अहमदनगरच्या इतिहासात ज्ञानोदय नियतकालिकाचे योगदान | सुरेखा दिनेश गांगुर्डे | ९६ |
| २६ | महाराष्ट्र राज्याच्या भांडवली खर्चाच्या प्रवृत्तीचे विश्लेषण | डॉ.संजय तळतकर | ९९ |
| २७ | योगाव्दारा वृध्दावस्थेत निरोगी राहण्याचा मंत्र | डॉ.लीला बनसोडे | १०३ |
| २८ | माळवा प्रांतातील मराठेकालीन प्रशासन व्यवस्था | डॉ.सुशीलकुमार शंकरराव सरवदे | १०५ |
| २९ | मन्नु भंडारी कृत आपका बंटी : अभिव्यंजना शिल्प | प्रा.डॉ.सुलक्षणा जाधव<br>संज्योती जगन्नाथ रोठे | १०८ |
| ३० | इक्किसवी सदी की हिंदी कविताओं मे व्यक्त नारी चित्र | प्रा.डॉ.द्वारका गिते-मुंडे | १११ |
| ३१ | स्त्री विमर्श हिंदी साहित्य में नारी जीवन | प्रा.डॉ. न.पु. काळे | ११४ |
| ३२ | दलित जीवन की व्यथा और मुक्तिपर्व | प्रा.डॉ.पवन नागनाथराव एमेकर | ११७ |
| ३३ | संतसाहित्यातून प्रकट झालेले पर्यावरण विषयक दृष्टिकोन | प्रा.प्रधान रामकृष्ण ज्योतिबा | १२० |
| ३४ | आदिवासींची सांस्कृतिक पार्श्वभूमी | प्रा. डॉ. जगतवाड एस. पी. | १२४ |
| ३५ | Exchange Rate and Foreign Trade of India : An Analysis of the Causal Relationship (१९९०-९१ to २०१०-११) | Dr. Maroti V. Tegampure | १२६ |
| ३६ | सत्यशोधकीय विचाराच्या प्रसार प्रचारात कादंबरीचे योगदान | डॉ.सौ.जयदेवी पवार | १३० |
| ३७ | सत्य और असत्य और लड़ाई नाटक | प्रा.बिरादार उमाकांत अनेप्पा | १३४ |
| ३८ | अहिल्याबाई होळकरांनी भिल्ल आदीवासी जमातीसाठी केलेले प्रशासकीय कार्य | सोनवणे सुजाता रामदास | १३६ |
| ३९ | देवनागरी लिपि का स्वरुप एवं महत्त्व | डॉ. मीना खरात | १३९ |
| ४० | मराठी नाटकाची आरंभीक स्थिती | डॉ. गजानन पां. जाधव | १४१ |
| ४१ | तुळाजी आंग्रे आणि बाळाजी बाजीराव संबंध | प्रा. डॉ. एम. जी. मोरे | १४४ |
| ४२ | हूमायूँ का मखबरा | प्रा. डॉ. शेख कलीम मोहियोद्दीन | १५० |
| ४३ | दलित नियतकालिके आणि अस्मितादर्शची वाटचाल | प्रा.सर्जेराव रणखांब | १५३ |
| ४४ | क्रीडा पत्रकारितेचे बदलते स्वरुप : नवे आकलन | प्रा.उमेश रामचंद्र साडेगावकर | १५६ |
| ४५ | परिवर्तनवादी धार्मिक चळवळी : एक संक्षिप्त आढावा | प्रा.डॉ.बी.एन.कवाळे | १६० |

# दलित नियतकालिके आणि अस्मितादर्शची वाटचाल

प्रा.सर्जेराव रणखांब

(मराठी विभाग)

देगलूर महाविद्यालय देगलूर

ADARSH EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

भारतावर फक्त राज्यच केले नाही, तर आपल्या दृष्टीचा भारतीय जीवनपध्दतीवर फार मोठा प्रभाव पाडला. राज्यकारभाराच्या ी त्यांना अनेक क्षेत्रात नवनवीन प्रयोग करावे लागले, आणि हे प्रयोग भारतीय जीवनपध्दतीत आमूलाग्र बदल घडवून आणणारे तीय समाज जागृतीला व शिक्षण प्रसाराला नवीन वळण देणारी घटना ठरली ती म्हणजे मुद्रणकलेचा उदय, या मुद्रणकलेमुळे ाची निर्मिती होऊन ग्रंथ-प्रकाशनाच्या कामाला प्रोत्साहन मिळू लागले. आणि याच काळात नियतकालिकांचाही उदय होऊ लागला. लिकामध्ये प्रामुख्याने साप्ताहिक, पाक्षिक, मासिक, त्रैमासिक, षण्मासिक, वार्षिक आदींचा समावेश होता. नियत म्हणजे नियमाने असा याचा अर्थ आहे. परंतु दैनिकांचा यात समावेश न करता, दैनिकाचे स्वरुप नियतालिकापेक्षा वेगळ्या अर्थाने लक्षात घेतले ब्स्टर्स वर्ल्ड युनिव्हर्सिटी' शब्दकोशात 'नियतकालिक' चा अर्थ "A Publication put out a regular inter-reater than a day, as a weekly, monthly, quarterely"[1] देण्यात आला आहे. वर्तमानपत्रात बातम्या आणि त्या तत्कालिक असण्याचीच जास्त शक्यता असते. नियतकालिकातील लेखनाचे स्वरुप वृत्तपत्राइतके प्रासंगिक नसते, तर सखोल व गंभीर चर्चा आणि विश्लेषण यात असते.

लिकाचे स्वरुप राजकीय, सामाजिक, व्यापार,धार्मिक, वाङ्मयीन असे विविधांगी असू शकते. प्रत्येक क्षेत्रातील नियतकालिके ल्या क्षेत्रातील विविध समस्यांना, प्रश्नांना वाचा फोडण्याची जी नानाविध क्षेत्र आहेत त्या सर्वांबद्दल लोकमतांची जडणघडण महत्वाचे कार्य नियतकालिके करीत असतात. वस्तुस्थिती लक्षात आणून दिल्याशिवाय समाजाचे मन तयार होऊ शकत नाही. सामाजिक बधिरता निर्माण होण्याची भीती असते. याला दूर करण्याचे कार्य नियतकालिकांना करावे लागते.

यतकालिकांचा उदय :-

सामाजिक प्रबोधनाची पहिली लाट भारतात एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात बंगालमध्ये आली. त्यानंतर दोन-एक महाराष्ट्राच्या भूमीवर तिचे बिजारोपण झाले. म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या चौथ्या दशकात ६ जानेवारी १८६२ रोजी मराठी दर्पण' हे पहिले नियतकालिक बाळशास्त्री जांभेकरांनी सुरु केले. तसेच '१८४०' मध्ये 'दिग्दर्शन' नावाचे पहिले मराठी मासिकही भाऊंनी सुधारणावादी मताचा प्रचार करण्यासाठी 'प्रभाकर' (१८४०) काढले. त्याच्या जोडीला 'धुमकेतू' ही निघाले.

मिशनऱ्यांचा 'ज्ञानोदय' (१८४१) मध्ये, तसेच 'ज्ञानप्रकाश' (१८४९), 'इंदुप्रकाश' (१८६२), 'नेटिव ओपिनियन' (१८६४) पत्रेही सुरु झाले. याशिवाय 'सत्यशोधक' (सातारा) 'शुभसूचक' (सातारा) 'खानदेशवैभव' (धुळे) याचीही भर पडली.

ज्ञानप्रसारक सभेच्या विद्यमाने १८५० मध्ये मराठी ज्ञानप्रसारक हे मासिक काढण्यात आले. बाळशास्त्री जांभेकर व भाऊ शास्त्रीय विषयाची माहिती देणारे ज्ञानदर्शन त्रैमासिक चालविले. कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी 'विचारलहरी' (१८५२) हे धार्मिक हिलेले मासिक सुरु केले.

नंतरच्या काळामध्ये चिपळूणकर, टिळक, आगरकर, परांजपे, केळकर यांचेही मराठी नियताकलिकांच्या संदर्भात महत्वाचे कार्य राठी नियतकालिकांच्या संदर्भात नियतकालिक हे जे पाश्चिमात्यांकडून घेतलेले विचारव्यक्तीकरणाचे साधन-त्याचा उपयोग ी लोकांनी आपल्या मराठी भाषेचे गद्य वैभव वाढविले, तिला विविध पाश्चिमात्य वाङ्मय प्रकारांनी सजविले आणि लोकशिक्षणाचे नाचे कार्य प्रचंड प्रमाणावर तिच्याकडून करवून घेतले. असे गौरवोद्गार काढले आहेत"[2]?

एकंदरित महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रातील लोकजागृतीला मुख्यतः मराठी नियतकालिकानेच बळकटी दिली, हे लक्षात येते.

दलितांची नियतकालिके :-

नियतकालिकासारखे समर्थ माध्यम हाती आल्यामुळे महाराष्ट्रातील अनेक समाजसुधारक आणि विचारवंतांनी आपल्या सामाजिक सुधारणांच्या चळवळीला प्रारंभ केला. महाराष्ट्रामध्ये, दलितांच्या प्रश्नाला वाचा फोडण्याचे व निर्भिड विचारांचे प्रहार लोकहितवादींनी 'प्रभाकर' मधून केले. म.फुले यांनी दलितांच्या उध्दारासाठी नियतकालिकातून आपली सडेतोड भूमिका स्पष्ट केली. 'सुधारकातून' गोपाळ गणेश आगरकरांनी समाजसुधारणाविषयक लेख लिहिले. गोपाळबुवा वलंगकरांनी 'दिनबंधू' तून तर महर्षी रामजी शिंदे यांनी अस्पृश्यताविषयक संशोधनात्मक लेखन आणि विचार 'मनोरंजन', 'सुबोधपत्रिका' आणि 'जागृती' या नियतकालिकांतून मांडले. सावरकरांनी 'केसरी', 'निर्भीड', 'सत्यशोधक', 'श्रध्दानंद', 'बलवंत', 'हिंदू', 'किर्लोस्कर', आदी नियतकालिकतून स्पृश्यांच्या मनात अस्पृश्यांविषयी जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

दलित समाज बांधवात आत्मभान निर्माण करण्यासाठी, विचारजागृती करुन आत्मोध्दाराची चळवळ उभी करण्यासाठी किसन फागुजी बनसोडे, शिवराम जानबा कांबळे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी नियतकालिकासारखे माध्यम हाती घेऊन दलित नियतकालिकांचा पायंडा नव्याने निर्माण केला.

शिवराम जानबा कांबळे यांनी १ जूलै १९०८ रोजी 'सोमवंशीय मित्र' या मासिकाची स्थापना करुन व दलितांचे पहिले नियतकालिक म्हणून मान मिळविला. किसन फागू बनसोडे यांनी 'निराश्रित हिंद नागरिक' साप्ताहिकाची स्थापना केली. १९२० नंतर हा प्रयत्न अधिक जोमदार पध्दतीने सुरु झाला. स्वतः डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ३१ जानेवारी १९२० रोजी 'मुकनायक' हे पाक्षिक सुरु केले व 'बहिष्कृत भारत' नावाने म.अ.गव्हर्नरने अमरावतीला मासिक सुरु केले. मुंबईतून १९२४ साली म.अ.कांबळे यांनी 'आत्मोध्दार' मासिक आणि दा.ना.पटवर्धन यांनी अस्पृश्यता निवारण साप्ताहिक सुरु केले. पुन्हा शिवराम कांबळेंनी आदी 'हिंदू' साप्ताहिकांची स्थापना केली. गरुड (कोल्हापूर), दा.म.शिर्के यांनी सुरु करुन बाबासाहेबांच्या विचारांचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला. परंतु याच्यातील काहीचे काही अल्पजीवी ठरले.

बाबासाहेबांनी ३ एप्रिल १९२७ रोजी 'बहिष्कृतभारत' (पाक्षिक) व त्यांच्याच नेतृत्वाखाली 'समता' पाक्षिक सुरु केले. याचे संपादक देवराव नाईक होते. समता व बहिष्कृत भारत हे ही अल्पजीवी ठरले. दरम्यानच्या काळात १९२८ साली वा.ना.राजाभोज यांनी पुण्यात दलित बंधूची स्थापना केली. ते वीस वर्ष टिकून राहिले. बाबासाहेबांनी परत 'जनता' हे चौथे नियतकालिक २४ नोव्हेंबर १९३० रोजी सुरु केले. यांच्या सपांदकत्वाची जबाबदारी देवराव नाईक, भा.द.कद्रेकर, गं.नी.सहस्त्रबुध्दे, बी.सी.कांबळे, यशवंतराव आंबेडकर, [illegible] सांभाळली. दीर्घकाळ (२६ वर्ष) चाललेल्या या साप्ताहिकाने दलितांच्या जीवनविषयक जाणिवांत आमूलाग्र बदल घडवून आणला.

१९३१ साली किसन फानोजी बनसोडे यांनी दुसरे साप्ताहिक सुरु केले. (चोखामेळा) तर १२ सप्टेंबर १९३६ रोजी पतितपावनदास यांनी नागपूरातून पतितपावन साप्ताहिक सुरु केले. काकासाहेब बरवे यांनी १ जून १९४१ ला दलित सेवक धुळे इथून सुरुवात केली.

१९४७ नंतरच्या दलित नियतकालिकांची यादी - दलित निनाद (साप्ताहिक) (कोल्हापूर) - मा.ई.कुरणे, अरुण (नागपूर) ना.ख.तिरपुडे (साप्ताहिक) सिध्दार्थ (जळगाव) दि.मा.खैरनार (साप्ताहिक) दलित भारत - ध.रा.बिऱ्हाडे, जागृती द.सा.गायकवाड (पुणे) साप्ताहिक, सिध्दार्थ-चंद्रकांत गायकवाड (मुंबई), जयभीम-सुरेश संसारे (बडनेर) निर्धार - आर.डी.भंडारे (मुंबई) अशी देता येईल. [illegible] साप्ताहिकेसुध्दा दोन वर्षांपेक्षा अधिक काळ टिकली नाहीत.

१९५० नंतर दलितांच्या सामाजिक समस्यांना वाचा फोडणारी अनेक नियतकालिके उदयास आली. नजर (मुंबई) - [illegible] व्हटकर, भीमगर्जना-(आडसूळ, रणपिसे) (मुंबई), धर्मदपि (नागपूर), सिध्दार्थकुमार, बोधिसत्व (नागपूर) - र.म.मेश्राय, बौध्दभारत (नागपूर) - स.म.मेश्राय व याच काळात यशवंतराव ऊर्फ भैय्यासाहेब आंबेडकरांनी जनता चे नामांतर प्रबुध्द भारत केले. अशी त्याची नावे सांगता येतील.

१९६० नंतरच्या दशकातील दलितांची नियतकालिके :-

मराठीतील अनेक प्रस्थापित नियतकालिके या काळात अनेक अडचणीमुळे बंद पडण्याच्या मार्गावर होती. त्यात तर ही दलित

लिके होती. अनेक नियतकालिके जपूनसुध्दा ठेवता आली नाहीत. परंतु काही झाले तरी दलितोध्दारांच्या संदर्भात प्रयत्न ाठी सुरुवातीच्या काळात या नियतकालिकांचा वाटा आहे हे जाणणे महत्वाचे आहे. दलित शोषितांनी एकोणिसाव्या आणि विसाव्या ज्या ज्या चळवळी उभ्या केल्या त्या सर्व चळवळींना आपले असे वृत्तपत्र किंवा नियतकालिक भक्कम आर्थिक पायावर उभे करता ाही, त्यामुळे ते वृत्तपत्र किंवा नियतकालिक दीर्घकाळ चालवण्यात त्यांना अपयश आलेले आहे.'' अशा शब्दांत भालचंद्र फडके ती प्रकट केली आहे.

र्शाचे स्वरुप आणि अंतरंग :-

मराठीतील नव्या वाड्मयीन प्रवृत्ती आणि त्याच्या मुळाशी संभवणाऱ्या जीवनविषयक नव्या जाणिवा समजावून घेण्या देण्यासाठी दर्श या त्रैमासिकाचा उदय झालेला आहे. नव्याने लेखन करणाऱ्यांना व साहित्यविषयक आस्था असणाऱ्यांना अस्मितादर्शच्या ारपीठ उपलब्ध झाले. दलित साहित्यात आज अग्रेसर असलेल्या लेखकांचा उदय हा अस्मितादर्श मधून झालेला आहे. १९६० नंतर हित्यात अनेक नवनवीन वाड्मयीन प्रवाह अस्तित्वात आले. त्यापैकी दलित साहित्याचा एक सशक्त प्रवाह होय. दलित साहित्य स्मितादर्श आंबेडकरी विचार आणि अस्मितादर्श यांचा अतूट संबंध आहे. दलित साहित्याची खोली आणि व्याप्ती वाढविण्याचे स्मितादर्शने केलेले आहे. इतकेच नाही तर त्याला सैध्दांतिक अधिष्ठान प्राप्त करुन देण्याचे श्रेयसुध्दा अस्मितादर्शकडे जाते.

अस्मिता हे पहिल्या अंकाचे नाव होत. अस्मिता चा पहिला अंक डिसेंबर, १९६७ मध्ये प्रकाशित झाला. तद्नंतर, अस्मितादर्श मान्य नावाने हे नियतकालिक प्रसिध्द होऊ लागले. अस्मितेच्या पहिल्या अंकाचे संपादक : म.ना.वानखेडे, कार्यकारी संपादक- ाधव तर सहाय्यक म्हणून ल.बा.रायमाने, गंगाधर पानतावणे, वामन निंबाळकर, सुखराम हिवराळे हे होते. नंतरच्या अंकापासून दर्श च्या यंत्रणेत थोडासा बदल झाला. डॉ.म.ना.वानखेडेंची, महाराष्ट्र शासनाने लोकसेवा आयोगाचे सदस्य म्हणून नेमणूक संपादकत्वाची जबाबदारी डॉ.गंगाधर पानतावणे यांनी उचलली. सुखराम हिवराळे, वामन निंबाळकर यांचेही या कामात सहकार्य डॉ.म.ना.वानखडे काही काळ अस्मितादर्शचे सल्लागार म्हणूनच राहिले, अस्मितादर्श च्या संगोपनासाठी त्यांनी महत्वाचे कार्य केले नही अस्मितादर्श औरंगाबादहून प्रागतिक विचार संसदच्या नावे, व डॉ.गंगाधर पानतावणे यांच्या संपादकाखाली प्रकाशित होते राष्ट्र राज्य साहित्यसंस्कृती मंडळाने या नियतकालिकात पुरस्कृत केले आहे.

अस्मितादर्श चे आणखी एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा होणारा लेखक मेळावा. अस्मितादर्श मधून उदयास आलेल्या डळींचा महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर मोठा वर्ग आहे. प्रत्येक वर्षी महाराष्ट्रात कोणत्याही लहान-मोठ्या किंवा महाराष्ट्राबाहेर मेळावा भरविला जातो. या मेळाव्यातून काव्यवाचन, कथाकथन, परिसंवाद, निबंधवाचन इ. कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या या निमित्ताने होणारे अध्यक्षीय भाषणही दलित साहित्य समाज आणि संस्कृतीशी निगडीत असते. दलित साहित्याचे स्वरुप, दलित ी प्रेरणा, वेदना-विद्रोह व नकार हे घटक आणि एकूण साहित्यविषयक मौलिक विचारांची मांडणी अध्यक्षांकडून केली जाते.

अस्मितादर्शमधून प्रकाशित होणाऱ्या साहित्याचे स्वरुप स्थूलमानाने लेख, कथा, कविता, समीक्षा चर्चा, टिपा या पध्दतीचे आहे. ळी अंक, वैशिष्ट्यपूर्ण स्वरुपात प्रसिध्द झालेले आहेत. १९७६ च्या अस्मितादर्शच्या दिवाळी अंकास उत्कृष्ट दिवाळी अंक म्हणून साई पारितोषिक मिळाले होते. एकंदरित साहित्य, संस्कृती, कला ह्या विषयातील काही मूलगामी प्रश्नांची चर्चा करणारे नवोदित वंत लेखकांचे लेख, स्थिर, स्थित आणि सिध्द कवींच्या कविता, नव्या ताज्या दमाच्या दर्जेदार कथा आणि उगवत्या पिढीचे लेखन अस्मितादर्शमधून प्रकाशित झालेले आहे.

:

Weestors World University Dictionary पृ.क्रं.७२०.
देशपांडे अ.ना.-आधुनिक मराठी वाड्मयाचा इतिहास, पृ.क्रं.५८
फडके भा.दि.-दलित नियतकालिकांच्या निमित्ताने दलितांची नियतकालिके हरिश्चंद्र निर्मळ, पृ.क्रं.९,१०.



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADARSH VIDYA PRASARAK EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *